# 4.अग्निशमन कार्यशाळा

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा आयोजित आपत्ति व्यवस्थापन कार्यशाळा 18/10/2022 हा कार्यक्रम कार्यशाळेत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना व लोकमंगल संस्थेच्या कर्मचारी वर्गास आग लागण्याची कारणे, आग प्रतिबंधक उपाययोजना आणि आपत्कालीन अग्निशमन या विषयी माहिती देण्यात आली. तसेच अग्निशमन प्रात्यक्षिके सुद्धा घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर महानगरपालिका अग्निशमन दलाचे **मुख्य अग्निशमन प्रभारी अधिकारी मा.श्री केदारनाथ आवटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय सहाय्यक अधीक्षक मा.श्री अच्युत दुधाळ सर , फायरमान श्री राजाराम मोरे , श्री तानाजी मंठाळकर ,श्री नीलेश माने आणि वाहनचालक श्री दत्तात्रय दुपारगूंडे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. प्राचार्य श्री वाय.बी गायकवाड सर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.**

कार्यक्रमासाठी उपस्थित मा.श्री अच्युत दुधाळ सर यांनी विद्यार्थ्यांना तसेच कर्मचारी वर्गास आपत्कालीन अग्निशमन व्यवस्थापन , उपाययोजना आणि प्रतिबंध याबद्दल मार्गदर्शन केले.

तसेच मा.श्री दुधाळ सर आणि त्यांच्या टीमने अग्निशमनची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली .







